# केनजी आणि जादुची बदकं

## जपानी लोककथा



# केनजी आणि जादुची बदकं

## जपानी लोककथा

मराठी : अश्विनी बर्वे





केनजी जेव्हा रोज सकाळी उठायचा तेव्हा तो सगळ्यात आधी उडणाऱ्या बदकांचे पेंटिंग बघत असे. ते पक्षी जवळजवळ जिवंत वाटायचे. त्यातील बदकं मोजायला त्याला आवडे, “एक… दोन… तीन… चार… पाच”.

दरवर्षी जेव्हा जंगली बदके जपानमधील त्याच्या घरावरून उडत, तेव्हा  केनजी हसे आणि आपल्या पेंटिंग मधल्या बदकांकडे बघे आणि त्यांना चिडवत असे. “तुम्ही तर फक्त माझ्या खोलीच्या भिंतीवर अर्धवट भरारी मारतात- तुम्हांला जंगली बद्कांबरोबर उंच उडायला आवडणार नाही का?”






एक वर्षी एवढा पाऊस पडला की, नदीचे पाणी घराच्या आत घुसले.पाण्यामुळे बिचाऱ्या केनजीची पुस्तके ओली झाली आणि त्याची पाने एकमेकांना चिकटून राहिली. त्याची काही खेळणी पण पाण्यात तरंगू लागली. पाच बदकांच्या पेंटीगचे काहीच नुकसान झाले नाही हे भाग्यच. कारण पेंटिग भिंतीवर लटकवले होते.



जेव्हा पाणी नदीत परत गेले, तेव्हा केनजी बांबूच्या वनात खेळायला गेला. त्याने एका म्हाताऱ्या माणसाला आपल्या दारावर काठीने ठोठावतांना पाहिलं. त्या माणसाने नाकावर एक गोल चष्मा घातलेला होता. केनजीला तो माणूस एका घुबडासारखा वाटला-एक भुकेले घुबड.!.

केनजी बांबूत लपला, थोड्यावेळाने तो घुबडासारखा माणूस कुठेतरी निघून गेला..



“बाबा,“ त्याने विचारलं. “तो माणूस कोण होता?”

"एक कला संग्राहक म्हणजे आर्ट कलेक्टर," त्याचे वडील म्हणाले. “तो माणूस पेंटिंग खरेदी करतो. पुरामुळे आपल्या घरातले तांदूळ सडून गेले.आता आपल्याला धान्य खरेदी करण्यासाठी पेंटिंग विकावं लागेल.”

केनजीला रडावं वाटत होतं कारण त्याला ते पेंटिंग खूप आवडत होतं.त्याला माहित होतं की त्याच्या आई-वडिलांना सुद्धा ते पेंटिंग आवडत होते. ते पेंटिंग जवळजवळ तीनशे वर्षापूर्वी एका प्रसिद्ध कलाकाराने केलं होतं.






ज्या दिवशी कला संग्राहक पैंटिंग घ्यायला येणार होता, त्यादिवशी केनजीने जंगली बदकांचा क्वाक-क्वाक आवाज ऐकला. ते दक्षिणेकडे स्थलांतर करण्यासाठी त्याच्या घरावरून उडत होते.

“तुम्ही त्या म्हाताऱ्या कलेक्टरच्या घरी जाण्याच्या आधी,” तो त्या पैंटिंग मधल्या बदकांना म्हणाला. “मी तुम्हांला एक कायम स्मरणात राहील असा अनुभव देवू इच्छितो.”

खूप लक्षपूर्वक त्याने आपला सगळ्यात मोठा पतंगावर बदकांचे पेटिंग चिटकवले. पतंग आकाशात उंच उंच उडाला. झाडं आणि घरांच्याही वर. जंगली बदकांनी क्वक-क्वाक म्हटलं. पतंगाला हवेने जोरात ओढलं. जसे की पैंटीग मधली बदकांना त्या जंगली बद्कांबरोबर उडायचं होतं.




जेव्हा केनजीने आपला पतंग खाली उतरवला, तेव्हा त्याला एक असामान्य गोष्ट दिसली. पतंगावर पाच बदके उडत होती. पण केवळ चारच बदके खाली आली. त्यांच्यातलं एक बदक, ज्याचं नाव युकी होतं, ते गायब झालं होतं.

केनजीला वाटलं की जणू काही युकी त्या जंगली बद्कांबरोबर उडून गेलं.

कला संग्राहकने ही गोष्ट मान्य करण्यास नकार दिला. "अरे!“ तो रागावून ओरडला. “चार बदकांचे पेंटिंग! सगळ्यांना माहित आहे,की यात पाच बदकं हवी. कोणी तरी पेंटिंग मधलं सगळ्यात मोठं बदक पुसून टाकलं आहे. त्यामुळे ते पेंटिंग बरबाद झालं आहे.”

मग त्याने आपली काठी जमिनीवर आपटली आणि इथून तो निघून गेला.





त्या रात्री घरी खाण्यासाठी काहीच उरलं नव्हतं, फक्त थोडेसे तांदूळ होते. सूप, नुडल्स, टोफू काहीच खायला नव्हतं.

मोठा हिवाळा हळूहळू संपला. एवढंच नाही तर हवा सुद्धा घराला धक्के देतेवेळी एका भुकेल्या पिल्लाचा आवाज करत होती. आणि जंगली बदकं उत्तरेकडे जात असतांना क्वाक क्वाक आवाज करतांना सुद्धा ते दुःखी वाटत होते.

जसं केनजीने बदकांचा आवाज ऐकला तेव्हा त्वरित तो सरळ बसला. मग त्याने भिंतीवरचे पेंटिंग काढले आणि ते सावकाश पतंगाला चिटकवले.

सगळं तसंच झालं जसं त्याला हवं होतं. त्याला आपल्या पतंगाच्या दोरीला ओढ जाणवत होती आणि जेव्हा त्याने आपला पतंग खाली उतरवला, तेव्हा पेंटिंग मध्ये पाच बदकं होती. ते नक्की आहे का हे बघण्यासाठी त्याने मोजले, “एक दोन, तीन, चार, पाच,” मग तो आईवडिलांना सांगण्यासाठी धावला की युकी बदक परत आले.




केनजीच्या वडिलांनी मग पेंटिंग एका लोखंडी कपाटात सुरक्षित लपवून ठेवले. मग त्याने आर्ट कलेक्टरला लिहलं.

यावेळी जेव्हा आर्ट कलेक्टरने तसबीर बघितली,तेव्हा त्याने आपले हात हवेत हलवले आणि म्हटलं, “अरे,“ तो एकटक बघत म्हणाला. “मागच्या वेळी एका महान कलाकाराचे पेंटिंग बरबाद होतांना पाहिलं होतं कारण त्यातलं एक बदक निघून गेलं होतं. यावेळी कोणी मुलाने हे पेंटिंग घासून खराब केलं आहे.”

मग त्याने आपली काठी आपटली आणि रागाने तिथून निघून गेला.

बिचारे केनजीचे वडील आपलं डोकं खाजवत राहिले. आता पेंटिंगवर अजब खुणा होत्या. अशा खुणा ज्या घासून नाहीशा होण्याची शक्यता नव्हती.

केनजीला त्याबाबत काही सांगण्यासारखे नव्हते.



त्यादिवशी मध्यरात्री केनजीला झोपेतून जग आली. “मला काही विचित्र आवाज ऐकू येत आहेत,” त्याने आपल्या आई-वडिलांना सांगितले.. "चिप-चिप आवाज लोखंडी कपाटातून येत आहे,”

केनजीचे वडील म्हणाले, “सगळेजण मागे उभं रहा.” मग त्यांनी कपाटाचा दरवाजा उघडला..

"ज़रा पेंटिंगकडे बघा!” केनजी ओरडला..

ज्या दोन खुणा,ज्यांना नाहीसं करणं अशक्य होतं त्या आता गायब झाल्या होत्या.त्याजागी दोन छोटी छोटी बदकाची पिल्लं होती. ते हलत नव्हते, ते तसेच बसलेले होते जसे की कलाकाराने त्यांना चित्रित केलं आहे.,“ मला माहित आहे, केनजी म्हणाला. “चित्रावरच्या त्या दोन खुणा म्हणजे युकी बदकाची पिल्लं आहेत.”



केनजीच्या वडिलांनी कला कलेक्टरला अजून एक पत्र लिहलं.यावेळी त्याचे घुबडासारखे डोळे आश्चर्याने आणि आनंदाने अजून मोठे झाले. त्याचे ओठ भुकेल्या मुलाच्या चॉपस्टिक्स सारखे म्हणाले, "मास्टरपीस! एक उत्कृष्ट कृती! एकदम चांगल्या स्थितीत, यात कोणतंही बदक गायब नाही आणि कोणी मुलाने ते रगडलंसुद्धा नाही. पाच उडणारी बदकं आणि त्यांची दोन पिल्लं. पाच बदकांच्या पेटिंगबद्दल तर सगळ्यांना माहित होतं. पण या सात बदकांच्या पेटिंगबद्दल कदाचित कोणी ऐकलं नसेल. हा एक महान शोध आहे.”

त्या माणसाने पेंटिंग खरीदण्यासाठी बटव्यातून पैसे काढले, पण केनजीचे वडील म्हणाले, “तुमचे आभार, माननीय महोदय, पण माझी पत्नी, मी आणि आमच्या छोट्या मुलाने हे पेंटिग विकायचं नाही असं ठरवलं आहे. तुम्ही हे आपल्या मोठ्या घरात कुठेतरी लावाल, जे कोणीच पाहू शकणार नाही. आम्हांला वाटतं की अशा सुंदर चित्राचा आनंद सगळ्यांना घेता आला पाहिजे.”

"अरे," आर्ट कलेक्टर जोरात ओरडला.त्याने आपली काठी जोरात आपटली आणि तिथून निघून गेला.

“थांबा," केनजीचे वडील म्हणाले, “तुम्हांला इच्छा असेल तर तुम्ही आमच्याकडे तिकीट घेणारे पहिले सन्मानीय ग्राहक होवू शकतात. त्यासाठी तुम्हांला फक्त एक नाणं द्यावं लागेल. हे एकमात्र चित्रं आहे ज्यात सात बदकं आहेत,एक छोटं नाणं सगळेजण देवू शकतील. मला वाटतं जपानमधिल प्रत्येकजण हे चित्र बघायला येईल, चीन आणि अमेरिकेतून सुद्धा लोक येतील.





लवकरच ही बातमी आगीसारखी सगळीकडे पसरली. लोक मोठ्या संख्येने पेंटिंग बघायला येवू लागले. पण त्या दोन छोट्या बदकांच्या आकाराबाबत लोक सहमत झाले  नाही.

केनजीने समजावलं, “ते फक्त वाढत आहेत,बस एवढंच.”

"एका पेंटिंगमध्ये बदकं कशी वाढू शकतात?” लोक नेहमी विचारत.

केनजी एवढंच म्हणाला, “मला वाटतं की ते तेव्हाच वाढतात जेव्हा त्यांना कोणी बघत नाही.”





काळ पुढे जात राहिला. आणि एका हिवाळ्यात चांदण्या रात्री,जंगली बदकांनी आपली दक्षिणेकडची यात्रा सुरु करण्यासाठी केनजीच्या घरावरून उड्डाण केलं. केनजी त्यांच्या रोमांचक दुरून येणारा एकाकी आवाज ऐकत झोपून गेला.

त्याने स्वप्नात पाहिलं की जंगली बदकं उतरून खाली आले आणि उघड्या खिडकीच्या बरोबर बसून हळूवार आवाज करत राहिले. त्याच्या अंधाऱ्या खोलीत काहीतरी हालचाल झाली आणि केनजीच्या गालाला कसला तरी स्पर्श झाला.

सकाळी आईने विचारलं, “तुझ्या गालाला काय खरचट लं कसं काय केनजी?”

केनजीला खरचटल्याचं कळलं सुद्धा नाही, पण जेव्हा त्याने पेंटिंग मधले बदकं मोजले तेव्हा तो खूप उत्साहित झाला.. एक. .दोन... तीन.. चार ... पाच – बस तेवढेच आहेत. म्हणजे मग ते स्वप्नं नव्हतं तर.



केनजी त्या तरुण बदकांच्या उडून जाण्यामुळे दुःखी झाला नाही. “ते वसंतात परत येतील,” त्याने सगळ्यांना सांगितलं. कारण त्यांना काही काळ आपल्या वडिलांबरोबर आणि जंगली बदकांबरोबर रहावं वाटतं आहे. आणि काही काळ आपली आई युकी आणि माझ्या बरोबर पण त्यांना रहावं वाटतं.

समाप्त